# ग्रामीण कृषि मौसम सेवा

## डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि भारत मौसम विभाग

ईमेल – gkmsakola@yahoo.com

**वाशीम जिल्हा कृषि हवामान सल्ला, पत्रक क्रमांक- ०१ /२०१९-२०** **मंगळवार, दिनांक - ०२.०४.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०३ एप्रिल २०१९ ते ०७ एप्रिल २०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०३/०४ | ०४/०४ | ०५/०४ | ०६/०४ | ०७/०४ |
| पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ४२ | ४३ | ४३ | ४४ | ४४ |
| किमान तापमान (अं.से.) | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ढग स्थिती (आकाश) स. / दु. | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | १३ | १० | १४ | १२ | १४ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६ | ५ | ४ | ५ | ६ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ११.५ | १०.२ | ११.८ | १३.१ | १७.९ |
| वा-याची दिशा स. / दु. | २९७ | २२५ | २५१ | ३२० | ३२८ |

| पिकांचे नाव | अवस्था | कृषि सल्लाव |
|---|---|---|
| उन्हाळी मका | | तापमानातील वाढ लक्ष्यात घेता मका पिकाचे नियमित सर्वेक्षण करून मक्यावरील नवीन लष्करी आळीचा प्रादूर्भाव आढळल्यास ( ५ टक्के प्रादूर्भावग्रस्त झाडे) त्वरित नियंत्रणाचे उपाय योजावेत. यासाठी थायोमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅब्डा सायहॅलोथ्रीन ९.५ टक्के , २.५ मिली किंवा क्लोरॅट्रॅनीलीप्रोल १८.५ टक्के ,३.०० मिली प्रती १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. यामध्ये अळी पोन्ग्यामध्ये उपजीवीका करीत असल्यामुळे रासायनिक किटकनाशककाची जास्त घनफळाच्या फवारणी (नॉपसॉक) पंपाद्वारे फवारणी केल्यास फवारणीचे द्रावण पोन्ग्यात जावून नियंत्रण मिळते. तसेच दाणेदार रासायनिक किटकनाशकांचा जमिनीत ओलावा असतांना फेकीव पदधतीने वापर करून दाणे जास्तीतजास्त पोंगयामधे पडेल याची काळजी घ्यावी त्यासाठी कार्बोफ्युरॉन ३ टक्के दाणेदार (सीजी) : ३३किलो/हेक्टर किंवा फोरेट १० टक्के दाणेदार (सीजी) : १० किलो/हेक्टर प्रमाणे उपयोग करावा. |
| रबी पिके | | रबी पिके काढलेल्या शेताची त्वरीत नांगरणी करावी. त्यामुळे जमीन तापण्यास मदत होवून किडींचे कोश व घटक बुरशीचा नायनाट होईल. तसेच माती परीक्षणाकरिता मातीचे नमुने काढून ते विद्यापीठ किंवा शासकीय मृद परीक्षण प्रयोगशाळेत योग्य शुल्कासह पाठवून माती परीक्षणाचा अहवाल मिळताच पिक परत्वे रासायनिक कृषि निविष्ठांचे नियोजन करावे. |
| गहु | काढणी | पिकाची काढणी करावी व तयार झालेला माल सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| उन्हाळी भुईमुग/ तीळ | वाढ | पाने पोखरणाऱ्या अळी, तूडतूडे व फुलकिडे च्या नियात्रासाठी लॅब्डा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ४.० ते ६.० मि.ली किंवा क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २८ मि.ली किंवा किंवा क्विनॉलफॉस १.५ टक्के भुकटी २३.३ किलो/हे. प्रमाणे फवारणी करावी. |
| भाजीपाला | वाढ | गावर, चवळी, काकडी, दुधीभोपळा, दोडका, कारली, ढेमसे, पालक, मेथी आणि कोथिंबीर यांची लागवड करावी. उन्हाळी मिरची, वांगे व टमाटे च्या ४ ते ६ आठवड्या वयाचे रोपोंची लागवड करावी. |
| उन्हाळी सुर्यफुल/ मुग | वाढ | उन्हाळी सुर्यफुल/ मुग पिकाला आवशक्यता नुसार ६ - ७ दिवसांनी ओलिताची वेवस्था करावी. |
| फळ पिके संत्रा | वाढ | संत्रा फळपिकांची उन्हाळी हंगामात फळबागांचे विशेष असे नियोजन करावे लागते, उन्हाची दाहकता कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे.<br>पाण्याच्या बचतीसाठी उन्हाळी हंगामात सेंद्रिय पदार्थ जसे कि गवत / पालापाचोळा / कुटार / ग्व्हांडा / तणस यांचा १० सेंटीमीटर थर देऊन आच्छादन करावे किंवा काळ्या रंगाच्या पॉलिथीन पेपरचे आच्छादन केल्यास झाडाजवळ ओलावा टिकून राहण्यास मदत होते. आच्छादनाचा वापर करतांना सोबतच प्रति झाड २-३ किलो गांडूळ खत धावे. सेंद्रिय खतांचा वापर जास्तीतजास्त केल्यास जमिनीतील पाणी धरुन ठेवण्याच्या क्षमतेत देखील वाढ होते.<br>ठिंबक सिंचन पद्धत ही अतिशय काटकसरीने पाणी वापरण्याची व देण्याची पद्धत आहे,या पद्धतीत ४० ते ५० टक्के पाणी बचत होते आणि अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणता येते . ठिंबक सिंचनामुळे रासायनिक खते देता येतात व यामुळे खतांची ३० टक्यापर्यंत बचत होते. उन्हाळ्यामध्ये उष्ण वाऱ्याची गती अधिक असते अश्या वेळेस जमिनीतील ओलाव्याचे बाष्पीभवन मोठया प्रमाणावर होते. वारा प्रतिरोधक वा वारा प्रतिबंधक झाडांची रांग बागे भोवती असल्यास बाष्पीभवनाचा वेग कमी करता येतो तसेच गरम झळापासून बागेचा बचाव सुध्दा करता येतो.<br>नाजूक व संवेदनशील कलमा यांच्या भोवती तुराट्यां चे किवां हिरव्या नेट चे आच्छादन केल्यास तीव्र उष्ण किरणांपासून बचाव करता येतो. उष्णतेमुळे झाडातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास झाडांच्या खोडावरील साली तडकण्याचे प्रमाण वाढू शकते अशावेळी झाडाचे बुरशीजन्य व इतर रोगापासून संरक्षण करण्याचा दृष्टीने उन्हाळ्याच्या सुरुवातीस खोडाला बोर्डो मिश्रण लावावे. बोर्डोमिश्रण एक ते दीड मीटर उंची पर्यंत लावावे. |

| | | |
|---|---|---|
| | | पाणी उपलब्ध असल्यास आंबिया बहराची फळे टिकून ठेवण्यासाठी ओलीत सुरु ठेवणे गरजेचे आहे जेणेकरून फळे झाडावर टिकतील. ठिबक सिंचनाची सोय असल्यास संत्रा व मोसंबी चे १ ते ४, ५ ते ७ व ८ वर्षावरील झाडांना अनुक्रमे १४ ते ६३, ८७ ते १४३ व १६३ ते २०४ लिटर पाणी प्रति दिवस प्रति झाड द्यावे.<br>आंबिया बहारातील संत्रा / मोसंबी / लिंबू झाडावरील फळगळ संभवते. फळगळ नियंत्रणाकरिता एनएए * १ ग्रॅम (१० पिपीएम) किंवा 2-4- डी* १.५ ग्रॅम (१५ पिपीएम) किंवा जिब्रेलिक अॅसिड * १.५ ग्रॅम (१५ पिपीएम) + युरिया १ किलो + कार्बेन्डाझीम * ०.१ % ( १०० ग्रॅम ). + १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून यांची फवारणी करावी. |
| चारा पिक | वाढ | चारा पिक कापणी योग्य झाले असल्यास जनावरांना नियमित चारा कापून खाऊ घालावा. |
| पशु व पक्षी | - | तापमानात वाढ झाली आहे त्यामुळे जनावरांसाठी पाण्याची मुबलक सोय करावी. दिवसातून दोनदा तीनदा पाणी पाजावे. उन्हापासून सौरक्षणसाठी जनावरांना थंड ठिकाणी बसण्याची सोय करावी. |

**सदर कृषि सल्लाक पत्रिकाडॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्याशिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्याचत आली.**

नोडल अधिकारी
ग्रामीण कृषि मौसम सेवा, अकोला
डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

संशोधन सहयोगी
ग्रामीण कृषि मौसम सेवा,
डॉ पंजाबराव देशमुखकृषि विद्यापीठ, अकोला